# आदेश

क्र.कावि/कक्ष७:२/प्रअभूसं/न.क्र.१०२/कावि-/ ११०९ /१९
जिल्हाधिकारी कार्यालय बुलडाणा
दिनांक- ३ / ०४ / २०१९

**विषय :-** भूसंपादन प्रकरण क्रमांक २७/२००८-०९ मोजे हिंगणा इसापुर, ता. नांदुरा जि.बुलडाणा (बुडीत शेती)यामध्ये भुमी संपादन व पुनर्वसन करतांना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारर्दशकतेचा हक्क अधिनियम २०१३ चे कलम १९(७) चे परंतुक प्रमाणे मुदतवाढ मिळणेबाबत.

**संदर्भः-** उपजिल्हाधिकारी भुसंपादन, मध्यम प्रकल्प, बुलडाणा यांचे पत्र क्र. कावि/ वशि/उपभुसं/ म.प्र./कलि /१४९/२०१९. दिनांक २९-०३-२०१९ (प्राप्त दि.०१-०४-२०१९.)

*****

ज्या अर्थी उपजिल्हाधिकारी भुसंपादन, मध्यम प्रकल्प, बुलडाणा यांनी त्यांच्या संदर्भीय पत्रानुसार भूसंपादन प्रकरण क्रमांक २७/२००८-०९ मोजे हिंगणा इसापुर, ता. नांदुरा जि.बुलडाणा (बुडीत शेती)यामध्ये भुमी संपादन व पुनर्वसन करतांना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारर्दशकतेचा हक्क अधिनियम २०१३ चे कलम १९(७) चे परंतुक प्रमाणे मुदतवाढ मिळणेबाबत प्रस्ताव सादर केला आहे.

सदर भूसंपादन प्रकरणात १०० टक्के एवढा निधी प्राप्त नसल्याकारणाने सदर प्रकरणात भूमी संपादन व पुनर्वसन करतांना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३ चे कलम १९(७) चे परतुंक प्रमाणे सहा महिन्याची एवढी मुदतवाढ देणेबाबत विनंती केली आहे.

ज्याअर्थी भूसंपादन पुनर्वसन व पुनर्वसाहत यामध्ये पारदर्शकता राखण्याचा हक्क अधिनियम २०१३ चे नियम १९(७) नुसार जेव्हा प्राथमिक सुचनेच्या तारखेपासून बारा महिन्याच्या कालावधीत पोट कलम १ मध्ये कोणतीही घोषणा प्रसिध्दी केलेली नसेल तेव्हा अशी घोषणा रद्द करण्यात आली असल्याचे समजण्यात येईल. परंतु या पोट कलमात निर्दिष्ट केलेला कालावधी मोजतांना, कोणत्याही न्यायालयाच्या आदेशाव्दारे दिलेल्या कोणत्याही स्थगितीमुळे किंवा मनाई हूकूमामुळे जमीन संपादनाची कार्यवाही ज्या कालावधीसाठी थांबलेली होती असा कोणताही कालावधी वगळण्यात येईल किवा असे कोणताही कालावधी वगळण्यात येतील.

परंतु आणखी असे समुचित शासनाच्या मते जर कालावधी वाढविण्याचे समर्थन करणारी परिस्थिती अस्तित्वात असेल तर, त्याला बारा महिन्याचा कालावधीत वाढ करण्याचा अधिकार असेल, अशी तरतूद आहे.

त्याअर्थी भूमिसंपादन पुनर्वसन व पुनर्वसाहत यामध्ये पारदर्शकता राखण्याचा हक्क अधिनियम २०१३ चे नियम १९(७) नुसार भुसंपादन प्रकरण क्र. २७/२००८-०९ मोजे हिंगणा इसापुर, ता. नांदुरा जि.बुलडाणा (बुडीत शेती) या प्रकरणात कलम-१९(१) ची अधिसुचना घोषित करण्यास ६ महिन्याची मुदतवाढ देण्यात येत आहे.

(डॉ.निरुपमा डांगे)
**जिल्हाधिकारी बुलडाणा**